RNI No. MAHENG/2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष ५, अंक ९(२)] बुधवार, मार्च ६, २०१९/फाल्गुन १५, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये २७.००

**असाधारण क्रमांक १६**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Tax Laws (Amendment and Validation) Ordinance, 2019 (Mah. Ord. VI of 2019), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA G. BHAGWAT,
Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

[ Translation in English of the Maharashtra Tax Laws (Amendment and Validation) Ordinance, 2019 (Mah. Ord. VI of 2019), published under the authority of the Governor ].

---

**FINANCE DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 6th March 2019.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VI OF 2019.**

*AN ORDINANCE*

*further to amend certain tax laws in operation in the State of Maharashtra.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend certain tax laws in operation in the State of Maharashtra, for the purposes hereinafter appearing ;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

CHAPTER I

PRELIMINARY

**1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Tax Laws ( Amendment and Validation) Ordinance, 2019. Short title and commencement.

(*2*) Save as otherwise provided in this Ordinance, it shall come into force at once.

## CHAPTER II

### AMENDMENT TO THE MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975.

Amendment of section 6 of Mah. XVI of 1975.

**2.** In section 6 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975, in sub-section (*3*), for the words "rupees one thousand" the words "rupees two hundred, in case he files the return within a period of thirty days after the expiry of the prescribed time for filing of such return and an amount of rupees one thousand, in any other case," shall be substituted. Mah. XVI of 1975.

## CHAPTER III

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

Amendment of section 10 of Mah. IX of 2005.

**3.** In section 10 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (hereinafter referred to as "the Value Added Tax Act"), to sub-section (*2*), the following proviso shall be inserted and shall be deemed to have been inserted with effect from the 1st July 2017, namely :— Mah. IX of 2005.

"Provided that, the officers appointed under the Maharashtra Goods and Services Tax Act, 2017 shall be deemed to be the officers appointed under the provisions of this Act.". Mah. XLIII of 2017.

Amendment of section 24 of Mah. IX of 2005.

**4.** In section 24 of the Value Added Tax Act, after sub-section (*2*), the following sub-section shall be inserted, namely :—

"(*2A*) Where any dealer has claimed set-off in the returns but such set-off is not confirmed before the passing of the order of assessment under section 23 for any reason whatsoever, then, at any time within two years from the end of the financial year in which the said order of assessment has been served, he may,—

(*a*) if he has not filed an appeal against the said order, or

(*b*) if he has filed an appeal against the said order, and he has withdrawn the entire appeal,

apply to the Commissioner for rectification of the order on the ground that the said set-off may be confirmed and is in a position to produce the necessary evidence for the same and thereupon, the Commissioner shall hold such inquiry as he may deem fit and after hearing the applicant, rectify the assessment order, if the claim for set-off is confirmed :

Provided that, in case the applicant covered by clause (*b*) above has filed an application under this sub-section, then the amount of dues, which was stayed earlier before withdrawal of appeal, shall not be recovered, till the disposal of such application.".

Amendment of section 26 of Mah. IX of 2005.

**5.** In section 26 of the Value Added Tax Act, after sub-section (*6C*), the following *Explanation* shall be inserted and shall be deemed to have been inserted with effect from the 15th April 2017, namely :—

"*Explanation.*—For the removal of doubts, it is hereby clarified that, the provisions of sub-sections (*6A*), (*6B*) and (*6C*) shall be applicable for any appeal, against all such orders, referred to in those sub-sections, irrespective of the period to which the order, appealed against, relates or irrespective of the date on which the proceedings in respect of such order have commenced.".

**6.** In Schedule A appended to the Value Added Tax Act, after entry 2, the following entry shall be added, namely :-- Amendment to Schedule A of Mah. IX of 2005.

| | | | |
|---|---|---|---|
| "3. | Sale of domestic natural gas by Gas Authority of India Limited to the Ratnagiri Gas and Power Private Ltd. during the period from the 1st April 2017 to 15th September 2017. | 1. Purchasing dealer has used the domestic natural gas for generation of electricity for the supply to Indian Railways.<br><br>2. Claimant dealer shall furnish a Energy Account Statement, obtained by Ratnagiri Gas and Power Private Limited from Western Regional Power Committee. | Nil.". |

## CHAPTER IV

### VALIDATION AND SAVING.

**7.** (*1*) Notwithstanding anything contained in any judgment, decree or order of any Court or Tribunal to the contrary, any assessment, appeal, review, levy or collection of tax in respect of sales or purchases effected by any dealer or person, or any action taken or thing done in relation to such assessment, appeal, review, levy or collection of tax under the provisions of Value Added Tax Act, as amended by the Maharashtra Tax Laws (Amendment and Validation) Ordinance, 2019 (hereinafter, in this section, referred to as "the Amendment Ordinance") shall be valid and always be deemed to be valid and effective, as if the provisions relating to assessment, appeal, review, levy or collection or action or thing were prevalent under the Value Added Tax Act, on the relevant date and accordingly,— Validation and saving. Mah. Ord. VI of 2019.

(*a*) all acts, proceedings or things done or taken by the State Government or by any officer of the State Government or by any other authority in connection with the assessment, appeal, review, levy or collection of any such tax, shall, for all purposes be deemed to be, and to have always been done or taken in accordance with the law ;

(*b*) no suit, appeal, application or other proceedings shall lie or be maintained or continued in any Court or before any Tribunal, Officer or other authority, for the refund of any tax so paid; and

(*c*) no Court, Tribunal, Officer or other authority shall enforce any decree or order directing the refund of any such tax.

(*2*) For the removal of doubts, it is hereby declared that nothing in sub-section (*1*) shall be construed as preventing a person,—

(*a*) from questioning in accordance with the provisions of the Value Added Tax Act, as amended by the Amendment Ordinance, any assessment, appeal, review, levy or collection of tax referred to in sub-section (*1*), or

(*b*) from claiming of refund of any tax paid by him in excess of the amount due from him by way of tax under the Value Added Tax Act, as amended by the Amendment Ordinance.

STATEMENT

With a view to bring clarity in certain provisions and to provide certain relief to the tax payers, the State Government considers it expedient to suitably amend the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975 (Mah. XVI of 1975) and the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah. IX of 2005).

2. The amendments proposed to be made are explained broadly as follows :—

*(1)* the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975 is being amended to provide for late fees of rupees two hundred in case the delay in filing the return is upto thirty days;

*(2)* the Maharashtra Value Added Tax Act, 2002 is being amended,—

(*a*) to authorize the officers appointed under the Maharashtra Goods and Services Tax Act, 2017 to exercise the powers under the said Act;

(*b*) to allow filing of an application for rectification under section 24 of an assessment order, in case the set-off is denied in the assessment order and the dealer is in a position to furnish evidence, in respect of the claim of set-off;

(*c*) to remove the ambiguity, if any, by providing that the provisions of sub-sections (*6A*), (*6B*) and (*6C*) of section 26 of the Act, as inserted by the Maharashtra Act No. XXXI of 2017, shall be applicable to all the appeals, irrespective of the date of commencement of the proceedings;

(*d*) to exempt the tax payable on sales of domestic natural gas by Gas Authority of India Limited to the Ratnagiri Gas and Power Pvt. Ltd. for the periods starting from the 1st April 2017 to the 15th September 2017.

3. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend certain tax laws in operation in the State of Maharashtra, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 6th March 2019.

CH. VIDYASAGAR RAO,
Governor of Maharashtra,

By order and in the name of the Governor of Maharashtra,

U. P. S. MADAN,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक ५(२)] बुधवार, मार्च ६, २०१९/फाल्गुन १५, शके १९४० [पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६.—** महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश .. .. . . . . | १-५ |


**वित्त विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ मार्च २०१९.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VI OF 2019.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND CERTAIN TAX LAWS IN OPERATION IN THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६.**

**महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र करविषयक कायदे (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०१९, असे म्हणावे.

(२) तो, या अध्यादेशात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, तात्काळ अंमलात येईल.

प्रकरण दोन

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ याची सुधारणा.**

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ याच्या कलम ६ च्या पोट-कलम (३) मध्ये, " एक हजार रुपये " या मजकुराऐवजी, " जर विवरण दाखल करण्यासाठी विहित मुदत संपल्यानंतर तीस दिवसांच्या कालावधीच्या आत असे विवरण दाखल करीत असल्यास, दोनशे रुपये आणि इतर कोणत्याही बाबतीत, एक हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९७५ चा महा. १६.

प्रकरण तीन

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ याची सुधारणा.**

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १० ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मूल्यवर्धित कर अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल आणि तो, दिनांक १ जुलै २०१७ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल :— २००५ चा महा. ९.

" परंतु, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ अन्वये नियुक्त केलेले अधिकारी हे, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये नियुक्त केलेले अधिकारी असल्याचे मानण्यात येईल.". २०१७ चा महा. ४३.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २४ ची सुधारणा.

**४.** मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम २४ मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येईल :—

" (२क) जेथे कोणत्याही व्यापाऱ्याने विवरणामध्ये वजावटीचा दावा केला असेल परंतु ज्या कोणत्याही कारणास्तव कलम २३ अन्वये निर्धारण आदेश काढण्यापूर्वी अशी वजावटीची निश्चिती झाली नसेल तेव्हा, ज्यावर्षी उक्त आदेश बजावण्यात आला असेल ते वित्तीय वर्ष संपल्यापासून दोन वर्षांच्या आत कोणत्याही वेळी, त्यास,

वर्ग क्क ाठी ेले र्ज.

(क) जर त्याने उक्त आदेशाविरूद्ध अपील दाखल केले नसेल तर, किंवा

(ख) जर उक्त आदेशाविरूद्ध त्याने अपील दाखल केले असेल, आणि संपूर्ण अपील मागे घेतली असेल तर,

उक्त वजावटीच्या निश्चितीसाठी आणि त्याकरिता त्याबाबतचा आवश्यक तो पुरावा सादर करण्याच्या स्थितीत आहे या कारणावरून त्या आदेशाच्या दुरुस्तीसाठी, आयुक्ताकडे अर्ज करता येईल, आणि त्यानंतर आयुक्त, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी करील आणि अर्जदाराचे म्हणणे ऐकूण घेतल्यानंतर, वजावटी बाबतचा दावा निश्चित करण्यात आल्यास, त्या निर्धारण आदेशात दुरूस्ती करील :

परंतु, अर्जदाराने वरील खंड (ख) नुसार या पोट-कलमान्वये अर्ज दाखल केला असल्यास, जे अपील मागे घेण्यापूर्वी या अगोदर थकीत होती अशी देय रक्कम, असा अर्ज निकालात काढण्यात येईपर्यंत वसूल करण्यात येणार नाही.".

**५.** मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम २६ मध्ये, पोट-कलम (६ग) नंतर, पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल आणि ते दिनांक १५ एप्रिल २०१७ पासून समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईलः— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २६ ची सुधारणा.

" **स्पष्टीकरण.**—शंका निरसनार्थ, याद्वारे असे स्पष्ट करण्यात येते की, पोट-कलमे (६क), (६ख) आणि (६ग) यांच्या तरतुदी ह्या, ज्या आदेशाविरूद्ध अपील करण्यात आले असेल तो आदेश ज्या कालावधीशी संबंधित असेल तो कालावधी किंवा ज्या दिनांकास अशा आदेशाबाबत कार्यवाही सुरू करण्यात आली असेल तो दिनांक विचारात न घेता, त्या पोट-कलमांमध्ये निर्दिष्ट केलेल्या अशा सर्व आदेशांवरील कोणत्याही अपिलास लागू होतील.".

**६.** मूल्यवर्धित कर अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची **क** मध्ये, नोंद २ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या अनुसूची क ची सुधारणा.

| | | | |
|---|---|---|---|
| "३ | १ एप्रिल २०१७ ते १५ सप्टेंबर २०१७ या कालावधी दरम्यान गॅस ऑथोरिटी ऑफ इंडिया लिमिटेड यांच्याकडून रत्नागिरी गॅस व पॉवर प्रायव्हेट लिमिटेड यांना केली जाणारी देशांतर्गत नैसर्गिक वायुची विक्री. | १. खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याने, देशांतर्गत नैसर्गिक वायूचा वापर, भारतीय रेल्वेला पुरवठा करण्याकरिता वीज निर्मिती करण्यासाठी केला असेल.<br>२. मागणीदार व्यापारी, पश्चिम प्रादेशिक विद्युत समिती यांच्याकडून रत्नागिरी गॅस व पॉवर प्रायव्हेट लिमिटेड यांनी प्राप्त केलेले, ऊर्जा लेखा विवरणपत्र (एनर्जी अकाऊंट स्टेटमेंट) सादर करील. | निरंक.". |

प्रकरण चार

**विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.**

**७.** (१) कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यामध्ये एतद्‌विरूद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र कर विषयक कायदे (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०१९ (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश "सुधारणा अध्यादेश" असा करण्यात आला आहे) याद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, याच्या तरतुदींन्वये कोणत्याही व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने केलेल्या विक्री किंवा खरेदीबाबत केलेले कराचे कोणतेही निर्धारण, अपील, पुनर्विलोकन, आकारणी किंवा वसुली, अथवा असे निर्धारण, अपील, पुनर्विलोकन, आकारणी किंवा वसुली यासंबंधात केलेली किंवा करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही किंवा गोष्ट ही जणू काही असे निर्धारण, अपील, पुनर्विलोकन, आकारणी किंवा वसुली अथवा अशी कार्यवाही किंवा गोष्ट यांसंबंधीच्या तरतुदी संबंधित दिनांकास मूल्यवर्धित कर अधिनियमान्वये अंमलात होत्या असे समजून, वैध असेल आणि ती नेहमीकरिता वैध व प्रभावी असल्याचे मानण्यात येईल, आणि तद्‌नुसार,— विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती. (२०१९ चा महा. अध्या. ६.)

(क) अशा कोणत्याही कराबाबतचे निर्धारण, अपील, पुनर्विलोकन, आकारणी किंवा वसुली यांच्या संबंधात राज्य शासनाने किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याने केलेली किंवा करण्यात आलेली सर्व कार्ये, कार्यवाही किंवा गोष्टी ह्या, सर्व प्रयोजनांसाठी, कायद्यानुसार करण्यात आल्याचे आणि त्या नेहमीच तशा प्रकारे केलेल्या किंवा करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) अशा रीतीने भरण्यात आलेल्या कोणत्याही कराच्या परताव्यासाठी कोणताही दावा, अपील, अर्ज किंवा इतर कार्यवाही, कोणत्याही न्यायालयात किंवा कोणतेही न्यायाधिकरण, अधिकारी किंवा इतर प्राधिकारी यांच्यापुढे दाखल करण्यात येणार नाही किंवा ती चालू ठेवण्यात येणार नाही ; आणि

(ग) कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण, अधिकारी किंवा इतर प्राधिकारी, अशा कोणत्याही कराच्या परताव्याचा निदेश देणारा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश, अंमलात आणणार नाही.

(२) शंका निरसनासाठी, याद्वारे घोषित करण्यात येत आहे की, पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे एखाद्या व्यक्तीला,—

(क) सुधारणा अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या तरतुदींनुसार, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कराचे कोणतेही निर्धारण, अपील, पुर्नविलोकन, आकारणी किंवा वसुली यांच्या संबंधात हरकत घेण्यास, किंवा

(ख) सुधारणा अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मूल्यवर्धित कर अधिनियम याअन्वये कराच्या रूपाने तिच्याकडून येणे असलेल्या रकमेपेक्षा अधिक असणारी, तिने भरलेल्या कोणत्याही कराची रक्कम परत मिळण्याची मागणी करण्यास,

प्रतिबंध होतो असा त्याचा अर्थ लावण्यात येणार नाही.

## निवेदन

विवक्षित तरतुदींमध्ये पारदर्शकता आणण्याच्या आणि करदात्यांसाठी विशिष्ट सहाय्याची तरतूद करण्याच्या हेतूने, राज्य शासनास, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. १६) आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा.९) यांमध्ये यथोचितरीत्या सुधारणा करणे इष्ट वाटते.

२. करावयाच्या प्रस्तावित सुधारणांचे स्थूलमानाने स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे :—

(१) विवरण दाखल करण्यात तीस दिवसांपर्यंत विलंब झाला असेल तर, त्याबाबतीत, दोनशे रुपये विलंब शुल्काची तरतूद करण्यासाठी, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यामध्ये सुधारणा करण्यात येत आहे ;

(२) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यामध्ये पुढील बाबींकरिता सुधारणा करण्यात येत आहे,—

(क) महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ अन्वये नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना उक्त अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करण्यासाठी प्राधिकृत करणे ;

(ख) निर्धारण आदेशात वजावट नाकारलेली असेल आणि वजावटीच्या दाव्याच्या संबंधात व्यापारी पुरावा सादर करण्याच्या स्थितीत असेल, त्याप्रकरणी कलम २४ अन्वये निर्धारण आदेशात दुरूस्ती करण्यासाठी अर्ज दाखल करण्याची परवानगी देणे ;

(ग) सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ द्वारे समाविष्ट करण्यात आल्याप्रमाणे, अधिनियमाच्या कलम २६ ची पोट-कलमे (६क), (६ख) आणि (६ग) यांच्या अशा तरतुदी कार्यवाहीचा प्रारंभाचा दिनांक विचारात न घेता, सर्व अपिलांना लागू असतील, यांबाबतची संदिग्धता असल्यास, दूर करणे ;

(घ) गॅस ऑथोरिटी ऑफ इंडिया मर्यादित यांच्याकडून रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर प्रायव्हेट लिमिटेड यांना दिनांक १ एप्रिल २०१७ ते दिनांक १५ सप्टेंबर २०१७ या कालावधीतील देशांतर्गत नैसर्गिक वायू विक्रीवरील देय करातून सूट देणे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही, आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ६ मार्च २०१९.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**यू. पी. एस. मदान,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.